## अपभ्रंश भाषेचे भेद -

आजकाल अपभ्रंश भाषेच्या भेदाविषयी अनेक मतमतांतरे पडलेली आपणाला आढळून येतात. परंतु प्राचीन व्याकरण ग्रंथातून मात्र असा फरक आढळत नाही. त्यानंतर रुद्रटाने 'काव्यालंकारात' देश भेदानुसार अपभ्रंशाचे भेद दाखविले आहेत. अपभ्रंशाचे विभाजन उत्तरवर्ती नमिसाधु, रामचंद्र, गुणचंद्र, पुरुषोत्तम, रायतर्क वागीश, क्रमदीश्वर, शारदातनमय इत्यादीनी केले आहे. १२ व्या शतकातील नमिसाधूने अपभ्रंशाचे उपनागर, आभीर, ग्राम्य असे तीन भेद केले आहेत. पुरुषोत्तमाने नागरक, ब्राचड आणि उपनागरक असे भेद केले असून, १३ व्या शतकातील शारदातनयाने नागरक, उपनागरक आणि ग्राम्य असे तीन भाग कल्पिले आहेत. १७ व्या शतकातील मार्कण्डेय याने नागर, उपनागर व ब्राचड असेच तीन भागात विभाजन केले आहे.

वरीलप्रमाणे अपभ्रंशाचे विविध प्रकारे विभाजन केलेले दिसून तर येतेच, परंतु त्याचबरोबर अपभ्रंश या शब्दाला प्रकृत-अपभ्रंश ग्रंथातून अवब्भंस, अवहंस, अवहत्थ, अवहट्‌ट, अवहट या विविध नावानी संबोधिले आहे. या अपभ्रंश शब्दाचा उल्लेख विद्यापतीने कीर्तिलता काव्यात, बंशीधराने प्राकृत पैंगल टीकेत, संदेश रासकात अब्दुर्रहमानाने, कुवलयमालेत उद्योत्तनसूरिने वेगवेगळ्या स्वरुपात केलेला दिसून येतो. नामवरसिंह यांच्यामते 'अवहत्थ, अवहंस, अवहट' इत्यादि अपभ्रंश तथा अपभ्रष्टाचे तद्‌भव रुप आहे.

## अपभ्रंश भाषेची ठळक वैशिष्ठ्ये-

१. अपभ्रंश भाषेचे प्रथम आणि ठळक वैशिष्ठ्य तथा लक्षण म्हणजे अकारान्त शब्दात जेथे प्रथमेत संस्कृतमध्ये विसर्ग व प्राकृतात ओ येतो तसेच दोन्हीत व्दितीय विभक्तीमध्ये जेथे अं येतो, अपभ्रंशामध्ये त्या सर्वांच्या ऐवजी 'उ' येतो. उदा.- रामु वणु इत्यादि. म्हणूनच नमिसाधूने या भाषेला उकारबहुला भाषा म्हणून संबोधिले आहे.

२. अपभ्रंश भाषेत शब्दयोगी अव्ययांचा देखील भरपूर प्रमाणात वापर केलेला दिसून येतो उदा.- तण व केर इ.

३. ही भाषा मुख्यतः योगात्मक आहे तरी, अयोगात्मक होण्याची तिची प्रवृत्ति अगदी स्पष्ट दिसते. कारण विभक्ति तीन चार उरल्या असून क्रियापदाचाही वापर कमी प्रमाणात दिसतो.

४. क्रियापदांच्या ऐवजी धातूसाधित विशेषणांचा वापर अधिक दिसतो.

५. काव्यरचना व नवी प्रणाली नवे छंद यांचा यात वापर आहे.

६. दोहा व पध्दडिया हे छंद म्हणजे अपभ्रंशाची खास निर्मिती आहे.

**अपभ्रंश भाषेची रुपरेखा व विभाजन-**

सहाव्या शतकापर्यंत अपभ्रंश साहित्य संस्कृत पाकृत यांच्या बरोबरीला येऊन पोहचले होते. आठव्या शतकात अपभ्रंश भाषेतील खास काही रचना पाहावयास मिळतात. हे साहित्य १६ व्या शतकापर्यंत वृध्दिंगत होत राहिले. तरीसुध्दा अपभ्रंश भाषेचा उत्कर्षकाल साधारणपणे ८ वे ते १६ वे शतक हाच मानला जातो. आधुनिक आर्यभाषा बरोबरच अपभ्रंश ही जैन धर्माची एक प्रमुख भाषा होऊन बसली आहे. श्वेतांबर संप्रदायाने १३-१४ व्या शतकानंतर अपभ्रंश ग्रंथरचना करण्याचे सोडून दिल्याचे दिसते तर दिगंबर संप्रदायाने या भाषेची सेवा १६ व्या शतकापर्यंत केलेली आढळते.

अपभ्रंश भाषेचे अध्ययन सुलभ व्हावे म्हणून या भाषेचे पुढील प्रादेशिक विभागात विभाजन केलेले दिसते. १. पश्चिमी प्रदेशाचे अपभ्रंश साहित्य- यात स्वयंभू, योगीन्दु, धनपाल, हेमचंद्र, अब्दुलरहमान, रामसिंह या कवींच्या कृतींच्या समावेश होतो. २. महाराष्ट्र प्रदेशाचे अपभ्रंश साहित्य- यात पुष्पदंत, मुनि कनकामर, यांच्या काव्यरचना येतात. ३. पूर्व प्रांतातील अपभ्रंश साहित्य- यात विद्यापतीचा समावेश कीर्तीलतेचा होतो. ४. उत्तर प्रदेश अपभ्रंशात नाथपंथियांच्या साहित्याचा समावेश होतो.

## जैन संस्कृत काव्य

जैन कवींनी संस्कृत भाषेतील सर्व प्रकारच्या काव्य साहित्यावर अनेक काव्ये लिहिली आहेत. यातील काही काव्यग्रंथ इतके अप्रतिम आहेत की, अनेक विव्दानांनी त्यांची वाहवा केली आहे. 'काव्यसाहित्यात प्रामुख्याने चरितनामांत महाकाव्य, इतरनामांत महाकाव्य, ऐतिहासिक महाकाव्य, संधान महाकाव्य, लघुकाव्य, एकार्थकाव्य, संदेश अथवा दूतकाव्य, सुभाषित आणि स्तोत्र या काव्यांची भर जैन कवींनी संस्कृत काव्यात

घालून संस्कृत काव्य भांडाराला अधिक समृध्द बनविले आहे. ' रचनेच्या विविधतेनेच नव्हे तर काव्य कौशल्याच्या दृष्टीनेही ती महत्वाची आहेत. या काव्यातून काव्य चमत्कार, सौंदर्यतेची विपुलता व त्याचबरोबर बोधामृताचा शिडकाव देखील केला आहे. विविध गुणांनी संपन्न असे, जैन विव्दान विरचित जैन संस्कृत काव्य अत्यंत महत्वाचे असल्याचे सहज दिसून येईल.

## जैन संस्कृत काव्याचा उद्‌भव-

प्राकृत ही सर्वसाधारण जनांची बोली भाषा असल्यामुळे प्रथम प्रथम जैन मुनींनी व विव्दानांनी आपल्या सर्व ग्रंथकृतींची रचना प्राकृत भाषेतच केल्याचे आढळते. भारतीय वाड्‌गमय विकासातील जैनाचार्यांची ही महान देणगी असल्याचे डॉ. विंटरनित्यसारख्या महान् विव्दानांनी देखील मान्य केले आहे. शिवाय 'अनुयोगव्दारामध्ये प्राकृत आणि संस्कृत दोन्ही भाषा ऋषिभाषित असल्याचे मानून दोन्हींना समान महत्व दिले आहे.

इसवी सन शतकाच्या प्रारंभी संस्कृत भाषा प्रसिध्द असून बहुतेक सर्व महान विव्दानांनी तिचा आपल्या ग्रंथरचनेसाठी वापर केला आहे. सर्वच लेखन संस्कृतमध्ये होऊ लागल्यामुळे इतरांनाही त्याचा अभ्यास करणे भाग पडले. भारतातील तत्कालीन सर्व दर्शनकारांच्या दर्शनशास्त्राचे लिखाण संस्कृतमध्ये सुरु झाले. जैन दार्शनिक देखील या घडामोडीत मागे राहिले नाहीत. प्राकृतप्रमाणेच संस्कृतचा स्वीकार करुन संस्कृत भाषेत त्यांनी अनेक महत्वाच्या काव्य ग्रंथांची निर्मिती केली. डॉ. भोलाशंकर व्यास यांच्या मतानुसार 'जैनांनी स्वतःच्या दर्शनाची छाप इतर दर्शनावर उमटण्यासाठी व त्याचबरोबर ब्राह्मणधर्माच्या मान्यतांचे खंडन करण्यासाठी संस्कृत साहित्याचा आधार घेतला. संस्कृत साहित्यात विविध कलाकृतींची निर्मिती करुन स्वतःच्या धर्माची छाप अधिक प्रभावीपणे पाडण्याचा त्याचा हा प्रयत्न अधिक सफल झाल्याचेही दिसते. वैदिक ब्राह्मण धर्मात जे महत्व वेदांना, बौध्दधर्मात जे महत्व त्रिपिटकांना तेच महत्व जैनधर्मात व्दादशांगवाणीला देण्यात आल्याचे दिसते.

आ. समंतभद्र हे काव्य निर्मितीच्या दृष्टीने पहिले संस्कृत कवि असून त्यांनी इ.स. २ ऱ्या शतकात स्तुति-काव्याची रचना करुन, जैन स्वीकृत संस्कृत-काव्यचा श्रीगणेश केला. संस्कृत भाषेतील काव्यांची निर्मिती ही बहुधा स्तवन काव्यानेच झालेली दिसनू येते. त्याचाच प्रभाव समंतभद्रांच्यावर पडून त्यांनी स्तवन काव्यानेच संस्कृत जैन साहित्याला सुरुवात केलेली दिसते. ही परंपरा इ. स. २ ऱ्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत अविरतपणे चालत असलेली दिसते.

## जैन काव्यांची विशेषता-

जैन संस्कृत काव्याचा मूलाधार व्दांदशांगवाणी आहे. या वाणीत आत्म उत्क्रांतिव्दारे प्रत्येक व्यक्तीला निर्वाण प्राप्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे. सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्राची साधना केल्याने मानवाला चिरंतन सुखाची प्राप्ति होते. जैन संस्कृत कवींनी आपल्या काव्यातून हा उपदेश देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येईल. या काव्यातून प्रकट होणारी काही वैशिष्ठ्ये पुढीलप्रमाणे आहेत- १. जैन संस्कृत काव्याने वर्णाश्रमाला विरोध केलेला दिसून येतो. मुनि व श्रावक हे दोन प्रमुख वर्ग असून चतुर्विध संघात मुनि, आर्यिका, श्रावक व श्राविका यांनाच समान मानले आहे. २. जैन काव्यातील नायक हा देव, ऋषि अथवा मुनि नसून व्यापारी, धर्मात्मा व्यक्ति, तीर्थंकर, शूरवीर असून तो इंद्रिय दमन केलेला दिसून येतो. ३. जैन संस्कृत साहित्यातील कथास्तोत्र लोकप्रचलित आहे. ४. काव्यातील नायकांनी आपले सर्वायुष्य जीवनमूल्यांची जपणूक, धार्मिक कार्य इत्यादीमध्ये व्यतीत केल्याचे दिसते. ५. या काव्यामधील चरित्रांचा विस्तार संस्कृत चरित्राप्रमाणे झाला नाही. ६. संस्कृत जनकाव्यातून आत्म्याचे अमरत्व विविध भव, तसेच इतर दर्शनकारांच्या अयोग्य मतांचे योग्य रीतीने खंडन केलेल दिसते. ७. या काव्यातून स्याव्दादाचा आदर केला आहे. ८. संस्कृत जैन कवींच्या काव्यशैलीतून मोक्ष, कर्मसंयोग, सत्यजीवनशोध, गृहस्थाचार, मुनिआचार यांचा विचार केलेला दिसतो. थोडक्यात संस्कृत जैन साहित्य विविधतेने समृध्द असल्याचे दिसते.

# चरितनामान्त महाकाव्य-

संस्कृत भाषेत जैन कवींनी चरितनामान्त महाकाव्यांची रचना विपुल प्रमाणात केली आहे. या महाकाव्यांचे विभाजन आपणाल महाकाव्य, ऐतिहासिक महाकाव्य, कथाकाव्य व लघुकाव्य असे करता येईल. या महाकाव्यांच्या नावाचा अंत चरित (चरित्र) या शब्दाने होत असला तरी, हे सर्व चरित्रग्रंथ महाकाव्याच्या लक्षणात यथास्थित बसू शकतात. चरितकाव्य नाव असले तरी, त्या काव्यातून महाकाव्याची सर्व लक्षणे असलेली आपणाला आढळून येतात. यातील काही महत्वाच्या महाकाव्यांचा विचार येथे करण्यात आला आहे.

## १. चंद्रप्रभचरित-

या महाकाव्याची रचना आचार्य वीरनंदि यांनी केली आहे. यात तीर्थंकर चंद्रप्रभ यांचे चरित्र वर्णिले आहे. त्यातील पौराणिक आख्यान रोमहर्षक झाले आहे. महाकाव्याची सर्व वैशिष्ट्ये यात आहेत. याचे रचनाकर्ते वीरनंदि नंदिसंघ देशीय गणाचे आचार्य असून त्यांचे गुरु अभयनंदि होते. या काव्याचा रचनाकाळ इ.स. ९७० ते ९७५ इतका आहे. पौषकृष्ण अष्टमीला चंद्रपथाचा जन्म झाला. इंद्राने त्यांचा जन्माभिषेक केला. त्यानंतर कवीने त्याच्या बालक्रीडा, राज्याभिषेक, विरक्ति, तपाचरण, केवलज्ञान प्राप्ति वगैरे गोष्टींचे सुंदर प्रकारे वर्णन केले आहे. या चरित काव्याचा आधार 'तिलोयपण्णत्ति' असावा. या महाकाव्याची विभागणी १८ सर्गात असून सर्गाच्या अंति छंदपरिवर्तन केल्याचे दिसते. काव्याचा आरंभ मंगलाचरणाने असून, काव्यात वस्तुव्यापार, इतिवृत्त, संवाद यांचा सुंदर संगम झाला आहे. वसंत, उपवन, वनविहार, जलक्रीडा, सायंकाल, अंधःकार, चंद्रोदय, गजक्रीडा, सेना संग्राम, देश, ग्राम, नगर बालक्रीडा, विजयप्राप्ति या विविध गोष्टींचे यथार्थ चित्रण केले आहे. शृंगार, वीर, बीभत्स, शांत या रसांचा या काव्यात समावेश असून, उपमा, उत्प्रेक्षा, रुपक, अतिशयोक्ति, दृष्टांतादि अलंकारांचा वापर केला आहे.

चंद्रप्रभ काव्याची शैली सुगम व मनोहर अशी वैदर्थी शैली आहे. भाषेत मंजुळता, मधुरता व सरसता आहे. काही काही ठिकाणी अंतःकरण द्रवणारी वर्णने असून, महाकाव्याच्या दृष्टीने हे एक अति उत्तम महाकाव्य मानावयास हरकत नाही.

## २. प्रद्युम्नचरित-

या महाकाव्याची रचना महाकवि महासेन यांनी केली असून, ते लाड बागड संघाचे आचार्य होते. या काव्याचा रचनाकाल इ. स. ९७४ इतका मानला जातो. या काव्यात प्रामुख्याने प्रद्युम्नाचे चरित्र वर्णिले असून, त्याचबरोबर व्दारकावतीनगरी, श्रीकृष्ण, त्याच्या विविध स्त्रिया, नारद इत्यादींचेही चरित्र रेखाटन केले आहे. प्रामुख्याने प्रद्युम्नाने केलेली तपश्चर्या व शेवटी अघाति कर्माचा नाश करुन त्याला झालेली निर्वाणाची प्राप्ती इत्यादींचे वर्णन केले आहे.

या काव्याचा मूलाधार जिनसेनेचे 'हरिवंशपुराण' व गुणभद्राचे 'उत्तर पुराण' असावे. महाकाव्याची सर्व लक्षणे या चरितग्रंथमध्ये आपणाला आढळतात. कथानक सर्गात असून त्यांची संख्या १४ इतकी आहे. सर्गान्तात छंदपरिवर्तनही आहे. कथानक पुराण प्रसिध्द असून त्यात करुण, श्रृंगार, शांत या रसांचा समावेश आहे. तसेच विविध वर्णनांतर्गत बाबीत नगर, समुद्र, पर्वत, संध्या, प्रातःकाल, युध्द, यात्रा व ऋतूंचेही वर्णन आहे. या काव्याची काव्यशैली वैदर्भी असून सरळता, स्वाभाविकता, प्रसादमयता हे तीन गुण यात आहेत.

**३. वर्धमानचरितम्-**

महाकवि असग रचित वर्धमानचरितम् काव्यात १८ सर्ग असून त्यात भगवान महावीरांचे जीवन वर्णन केले आहे. मारीच, विश्वनंदी, अश्वग्रीव, त्रिपृष्ठ, सिंह, कपिष्ठ, हरिषेण, सूर्यप्रभ यांच्या पूर्व जन्माची कथा यात वर्णिली आहे.

महाकवि असग हे नागनंदि आचार्यांचे शिष्य असून त्यांच्या पित्याचे नाव षटुमति व मातेचे नाव वैरेति असे होते. रचनाकाल इ. स. ९८८ इतका मानला जातो. या महाकाव्याची रचनाच मुळी कवीने महाकाव्य तत्वांच्या आधारावर केली आहे. त्यात संध्या, प्रभात, मध्यान्ह, राज्य, वन, सूर्य, पर्वत, समुद्र, व्दीप यांचे सांगांपांग वर्णन आहे. आपल्या कर्मानुसार कसे कर्मफळ मिळते हे कवीने या चरित्राव्दारे दाखवून दिले आहे. काव्यात अनुप्रास, यमक, उपमा, उत्प्रेक्षा यांचा समावेश असून विविध छंदाचाही उपयोग केला आहे. या काव्याची शैली किरातार्जुनीयम् याच्याशी मिळती जुळती असून, समासान्त पदांचा अधिक उपयोग करण्यात आला आहे.

**इतरनामान्त महाकाव्य-**

चरितनामान्त व इतरनामान्त महाकाव्यात विशेष फरक असल्याचे आढळून येत नाही. दोन्ही विभागातील काव्यात महाकाव्याची तत्त्वे समाविष्ठ झालेली दिसून येतात. फरक एवढाच आहे की, इतरनामान्त महाकाव्यात महाकाव्याची सर्व शास्त्रीय लक्षणे आढळतात तर, चरितनामान्त महाकाव्यात प्रमुख उद्देश चरित्र सांगून चारित्रिक गोष्टींचे उत्थान करणे असून, नामान्त महाकाव्याचा उद्देश अलंकृत शैलीच्या व्दारे महाकाव्यातील गुणांचे प्रकटीकरण करणे हा असतो. इतरनामान्त महाकाव्याचे दुसरे नाव शास्त्रीय महाकाव्य असेही आहे. काही इतरनामान्त महाकाव्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## १. धर्मशर्माभ्युदयम्-

या महाकाव्यात १५ वे तीर्थंकर धर्मनाथ यांचे चरित्र वर्णन केले असून, ते २१ सर्गात विभाजित केले आहे. धर्म-शर्म-धर्म आणि शांति अभ्युदयाचे वर्णन यात असल्यामुळे महाकाव्याचे नाव 'धर्मशर्माभ्युदयम्' असे ठेवले आहे.

या ग्रंथाची रचना कवि हरिचंद्र यांनी केली असून त्यांचा जन्म संपन्न घराण्यात झाला होता. त्यांच्या पित्याचे नाव आर्द्रदेव व मातेचे नाव रथ्यादेवी होते. ते कायस्थ जातीचे असून जैन धर्मावलंबी होते. कवीने स्वतःला भगवान महावीरल चरणकमलावरील भ्रमर म्हटले आहे. कवीचे अध्यन विशाल व गंभीर आहे. कवीने रघुवंश, कुमारसंभव, किरात, शिशुपालवध, चंद्रप्रभचरित, तत्वार्थसूत्र, उत्तरपुराण, रत्नकरण्डश्रावकाचार, उवासगदसा, सर्वार्थसिध्दि या ग्रंथाचे अध्ययन केल्याचे दिसते. या काव्याची रचना इसवी सन १२३० पूर्वीचे असावी.

कवीने ग्रंथारंभी मंगलाचरण, सज्जनप्रशंसा, दुर्जननिंदा त्यानंतर जंबूव्दीपाच्या अंतर्गत असणाऱ्या भरतक्षेत्राचे वर्णन केले आहे. या क्षेत्रातील समस्त ऋध्दि सिध्दी यांचे निवासस्थान असणाऱ्या रत्नपुराचेही सुंदर वर्णन केले आहे. महाकाव्याला उचित अशी रचना होण्यासाठी कवीने स्वयंवर वर्णन, विंध्याचल, षड्ऋतु, जलक्रीडा, संध्या, चंद्रोदय, रतिक्रीडा यांचे सुंदर वर्णन केले आहे. सर्वात शेवटी वैराग्यविषयक वर्णन करुन ग्रंथाचा शेवट केला आहे. या महाकाव्यात उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास या अलंकाराचा समावेश असून उपजाति, मालिनी, वसंततिलका, शार्दुलविक्रीडित इत्यादि छंदाचाही वापर केला आहे. हरिचंद्राच्या या काव्याची तुलना दशकुमारचरित, शिशुपालवध यांच्याशी केली जाते. भाषाशैलीच्या दृष्टीने हे एक उत्कृष्ट काव्य असून महाकाव्याच्या सर्व गुणांनी संपन्न आहे.

## २. नेमिनिर्वाणकाव्यम्-

या महाकाव्यात तीर्थंकर नेमिनाथ यांचे जीवन वर्णिले आहे. या महाकाव्याची रचना महाकवि वाग्भट यांनी केली असून त्यांनी 'अष्टांगहृदय' नामक आयुर्वेद ग्रंथाचीही रचना केली आहे. या ग्रंथाचा लेखनकाल वि.स. ११७९ हा आहे. हे पौरवाड कुलातील असून त्यांच्या पित्याचे नाव छाहड होते. त्यांचा जन्म

अहिच्छत्रपुरात झाला होता. नेमिनिर्वाण महाकाव्य चंद्रप्रभचरित व धर्मशर्माभ्युदय या दोन्हीपासून प्रभावित झालेले दिसते. याशिवाय कवीने जिनसेन प्रथम यांच्या हरिवंश पुराणाचा आधार घेतला आहे. हरिवंश उत्तरपुराणाबरोबर कवीने तिलोयपण्णत्तीचाही अभ्यास केलेला दिसतो.

प्रस्तुत काव्यात व्दारवतीनगरी वर्णन, स्त्री पुरुष चित्रण, देवमंदिर, प्रकृति चित्रण सुंदरपणे रेखाटले आहे.महाकाव्याच्या सर्व तत्वांचाही यात समावेश आहे. संध्या, नगर देश, रात्रि, वन, नदी, पर्वत, समुद्र, व्दीप यांचेही अलंकृतरीत्या वर्णन केले आहे. पुत्रचिंता, प्रेम, विवाह, कुमारोदय, मधुपान, वनविहार, जलक्रीडा यांचेही वर्णन आहे. ग्रंथातील भाषा सरळ, मधुन असून त्यात अनेक अलंकार, छंद तसेच रस यांचा उपयोग केला आहे.

**३. जयन्तविजयम्-**

हे शब्दांक काव्य असून या महाकाव्यात १९ सर्व व २२०० पद्ये आहेत. एखाद्या तरुण सुंदर नायिकेच्या हृदयाप्रमाणे या काव्याची काव्यशैली आपले मन आकृष्ट करुन घेते. याची शैली अलंकृत असून ती उदात्त भावनेने युक्त आहे. या कृतीचे कर्ते श्वेतांबर संघातील चंद्रगच्छीय वर्धमानसूरि आहेत. त्यांचे जिनेश्वर व बुध्दिसागर हे दोन शिष्य होते. या काव्याची रचना वि. सं. १२७८ मध्ये झाली आहे.

ग्रंथारंभी कवीने ऋषभदेव, नेमिनाथ, पार्श्वनाथ व वर्धमान तीर्थंकर यांची स्तुति गाऊन मगध देशाचे वर्णन केले आहे आणि याच मगध देशात जयंति नावाची एक नगरी आहे. पुढे जयंत या नायकाचे चरित्र चित्रण रेखाटले आहे. वैरिसिंह जयंतावर हस्तिनापुरचे राज्य सोपवून दीक्षा कसा ग्रहण करतो याचे सुंदर वर्णन केले आहे. महाकाव्याच्या दृष्टीने हे एक सुंदर काव्य आहे. यात सर्गबध्दता, महच्चरित, अर्थसौष्ठवता, अलंकारयुक्तता व रसपूर्णता हे विविध गुण आहेत. प्राकृतिक वर्णनाच्या दृष्टीनेही हा ग्रंथ महत्वाचा आहे. तो अलंकार व छंदादींनी युक्त असून या महाकाव्यावर महाकवि कालीदासाचे काव्य, किरातार्जुनीय, शिशुपालवध, नैषधचरितम् या संस्कृत ग्रंथाचा प्रभाव दिसतो.

**४. नरनारायणानन्द महाकाव्य-**

'आनन्द' नामान्त काव्याची परंपरा पतंजलीपासून सुरु झालेली दिसते. अमरचंद्रसूरींचे परमानंद, नैपाल कवीचे भारतानन्दनाटक, आशाधर रचित कविदानन्द, अप्पय दीक्षितरचित कुवलयानन्द इत्यादि आनंद नामान्त ग्रंथरचना दिसून येतात. प्रस्तुत महाकाव्याची रचना वस्तुपाल याने केली असून, त्यात श्रीकृष्ण आणि

अर्जुन यांची मैत्री, रैवतक पर्वतावर त्यांचा विहार अर्जुनाव्दारे सुभद्रा हरण, बलदेवाचे युध्द, सुभद्रा-अर्जुन विवाह इत्यादि विषयांचे विवेचन केले आहे. हे काव्य महाभारताला आधारभूत मानून लिहिले आहे. वाचक जनात या काव्याची अधिक लोकप्रियता असून त्याचे विभाजन १६ सर्गात केले आहे.

रचनाकर्ता गुजरातचा रहिवासी असून सरस्वती व लक्ष्मी या दोन्हींची त्याच्यावर कृपा होती. स्वतः कवि असून वस्तुपाल इतर कवींचा आश्रयदाता होता. वस्तुपालाचे टोपण नाव वसंतपाल असून त्यांच्या पित्याचे नाव आशाराज व मातेचे नाव कुमारदेवी होते. कवीच्या गुरुंचे नाव विजयसेनसूरि होते. या ग्रंथाचा रचनाकाल सुमारे १३ वे शतक मानला जातो. वस्तुपालाने आदिनाथस्तोत्र, आम्बिकास्तोत्र, नेमिनाथस्तोत्र, आराधनागाथा या इतर ग्रंथाची रचना केली होती. या ग्रंथाची रचना व्दारवती वर्णनाने होऊन त्यात संध्या, रात्रि, सूर्योदय, सुरापान, सूरतक्रीडा, दोलान्दोलन, वन, पर्वत यांचे वर्णन आहे. या महाकाव्यातील भाषा प्रौढ, मनोरम असून काव्य शैलीच्या दृष्टीने हा एक उत्तम ग्रंथ मानला जातो.

**५. पद्मानंद महाकाव्य-**

महाकवि अमरचंद्ररचित हे महाकाव्य १९ सर्गांनी युक्त आहे. यात ऋषभ देवांचे चरित्र वर्णिले आहे. या काव्याला 'जिनेंद्रचरित' य दुसऱ्या नावानेही संबोधिले जाते. महाकवि अमरचंद्र प्रकांड पंडित असून अनेक राज्यसभेत ते आपल्या अधिकारवाणीने बोलत असत. या अमरचंद्रांनी या महाकाव्याची रचना १३ व्या शतकात केली आहे. पद्मानंद महाकाव्याशिवाय या महाकवीने बालभारत, काव्यकल्पलता, स्यादिशब्दसमुच्चय, छंद रत्नावली या ग्रंथाची रचना केली आहे. पद्मानंद काव्य हे महाकाव्याच्या बहुतेक गुणांनी संपन्न असून, त्यात वसंत, ग्रीष्म, वर्षा, शदर, हेमंत व शिशिर या ऋतूंचे वर्णन केले आहे. बाललीला, राज्यव्यवस्था, भरताचा दिग्विजय, बाहुबलीची विरक्ति या घटनांचाही उल्लेख केला आहे.

प्रस्तुत महाकाव्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे या ग्रंथात तत्कालीन समाज जीवनाचे तसेच संस्कृतीचे सुंदर वर्णन केले आहे. विवाहाप्रसंगीचे चित्रण इतके आकर्षकरीत्या केले आहे की, तसे इतरत्र क्वचितच पाहावयास मिळते.

या काव्यात अनेक अलंकार, छंद यांचा वापर केला असून या काव्याची भाषाशैली प्रसादगुणाने युक्त आहे. संपूर्ण काव्यात वैदर्भी शैलीचा उपयोगर केला आहे. दार्शनिक व आचारासंबंधी विषयांचे प्रतिपादन करीत असताना, भाषा अत्यंत सरळ व अनुप्रासांनी युक्त झाली आहे. संस्कृत जैन महाकाव्यापैकी हे एक महत्वाचे महाकाव्य मानले जाते.

## इतर काव्य साहित्य-

यापूर्वी वर्णन केलेल्या विविध संस्कृत जैन काव्याशिवाय आपणाला आणखीही काही काव्य ग्रंथ पाहावयास मिळतात. या ग्रंथांचे विभाजन आपणाला संधान काव्य, ऐतिहासिक महाकाव्य, अभिलेख काव्य, एकार्थकाव्य, संदेशकाव्य व स्तोत्रकाव्य या सहा विभागात करता येईल.

### १. संधानकाव्य-

संधानकाव्य हे महाकाव्यापासून थोडे वेगळे काव्य असून त्यात श्लेषाव्दारे २, ३, ४ अथवा त्याहून अधिक कथांचा समावेश करुन या काव्यांची रचना केली जाते. याची विशेषता अशी की, यात क्लिष्ट शब्द आणि वाक्यांचे नियोजन करुन चमत्कारपूर्ण अर्थविधान उपस्थित केले जाते. प्रत्येक श्लोकात एकाहून अधिक अर्थ क्लिष्ट असतात. म्हणूनच काव्याच्या बाह्य रुपाचा चमत्कार विशेष रुपाने चित्राकर्षक होतो.

या प्रकारच्या काव्यात आपणाला धनंजयरचित व्दिसंधान (९ वे शतक), मेघविजयरचित सप्संधान (१८) वे शतक यांचा समावेश करता येईल.

### २. ऐतिहासिक महाकाव्य-

ऐतिहासिक महाकाव्य रचण्याची प्रथा संस्कृतमध्ये अति प्राचीन काळापासून प्रचलित असून, जैन कवीनीही त्यात आपले योगदान केले आहे. ऐतिहासिक महाकाव्य ऐतिहासिक घटनांनी युक्त असून त्यात इतिहास पुरुषाचे चरित्र असते.

या प्रकारच्या काव्यात नमचंद्रसुरिरचित हम्मीर महाकाव्य प्रसिध्द असून त्याची रचना वि. सं. १४५७ मध्ये झाली असून त्यात चौहान वंशाचे विस्तृत वर्णन आहे.

### ३. अभिलेख काव्य-

अभिलेखांचे इतिहास व संस्कृतीच्या दृष्टीने जितके महत्व आहे त्यापेक्षा अधिक काव्यदृष्ट्या आहे. यात ऐहोल अभिलेख, मन्ने अभिलेख व कोन्नूर (धारवाड) अभिलेख प्रसिध्द आहेत.

**४. एकार्थ काव्य-**

ही एक प्रकारची वेगळीच काव्यरचना असून तिला महाकाव्य म्हणता येत नाही. कारण महाकाव्याला उचित अशा वस्तुव्यापारांचे व भावव्यंजनेचे दिग्दर्शन एकार्थ काव्यात नसते. तरीसुध्दा एकार्थ काव्यात महाकाव्याप्रमाणे पूर्ण जीवनवृत्तांत, कथा सलगता, सर्ग विभाजन इत्यादि बाबी असतात. याशिवाय एकार्थ काव्यात कथाप्रवाह विस्तृत नसून संक्षेपाने घेतला जातो. त्यातील वर्णन चमत्कृतींनी युकत नसते. संध्या, उषा, सूर्योदय, चंद्रोदय, वन, पर्वत, समुद्र, नदी, नगर, ऋतुवर्णन, जलक्रीडा, दोलाक्रीडा यांचे वर्णन नाममात्र आलेले असते. कवि कथेचा विस्तार करीत जातो परंतु त्या कथेत कसल्याही प्रकारची विविधता नसते. हृदयस्पर्शी स्थळांची कमतरता असते. त्यातील एखादेच वर्णन रसपूर्ण झालेले असते. यातून फक्त कथेचा स्वाद घ्यावयास मिळतो. वैचारिक सामुग्रीची मात्र कमतरता असते.

एकार्थ काव्यात वादभिसिंहकृत क्षत्रचूडामणि (९ वे शतक), श्रीपालाचे वैरोचन पराजय (१२ वे शतक), अरिसिंहाचे सुकृतसंकीर्तन (१३ वे शतक), धनेश्वरसूरीचे शत्रूंजय माहात्म्य (१२ वे शतक), जयतिलकरचित मलयसुंदरीचरित (१५ वे शतक), सोमकीर्तीचे प्रद्युम्नचरित (१६ वे शतक), पद्मसुंदराचे रायमल्लाभ्युदय इत्यादि काव्यांचा समावेश करता येईल. एकार्थ काव्याचा विकास १५, १६, १७ व्या शतकार अधिक झालेला दिसतो.

**५. लघुकाव्य-**

लघुकाव्यांची रचना देखील संस्कृत जैन कवींनी अधिक प्रमाणात केल्याची आपणाला दिसते. लघुकाव्यातील सर्गांची संख्या जास्तीत जास्त आठ अथवा सहाहून कमी असते. लघुकाव्यात विषयाची मांडणी फार विस्तृत अथवा लांबलचक न ठेवता मुद्देसूद करण्याचा प्रयत्न केलेला असतो. खंडकाव्यात महाकाव्याप्रमाणे सृष्टीसौंदर्यादि बाबींचेही फारसे अवडंबर नसते.

या लघुकाव्यात आपणाला वादिराजाचे यशोधरचरित (११ वे शतक), मल्लिषेणाचे नागकुमार काव्य, जयंतितिलकाचे मलयसुंदरीचरित (१५ वे शतक), पद्मसुंदराचे रामल्लाभ्युदय (१७ वे शतक) व जगन्नाथकवीचे सुषेणचरित (१७ वे शतक) ही लघुकाव्ये प्रसिध्द आहेत.

**६. संदेशकाव्य-**

याला 'दूतकाव्य' या नावाने देखील संबोधिले जाते. विप्रलंभ शृंगार तसेच विरहाच्या पृष्ठभूमीवर अशा प्रकारची काव्ये लिहिली जातात. जैन कवींनी संदेश काव्यातील शृंगारप्रधान काव्याला शांतरसाकडे वळवून एक नवीनच दिशा दिली आहे. त्याग व संयम हेच जीवनाचे अंतिम ध्येय समजणाऱ्या कवींनी प्रेम व शृंगारप्रधान काव्यात संस्कृतीच्या उच्च तत्वांचा देखील समावेश केला आहे. संस्कृत जैन साहित्यातील संदेश काव्यात पार्श्र्वनाथ, नेमिनाथ या महापुरुषांच्या जीवन वृत्तांताचा समावेश केला आहे.

संदेश काव्यातील जिनसेन व्दितीय यांचे पार्श्र्वाभ्युदय हे उच्च कोटीतील काव्य असून, हरिवंशपुराणकर्ते जिनसेन यांनी या काव्याची स्तुति केली आहे. याशिवाय विक्रमाचे नेमिदूत (१३ वे शतक) मेरुतुंगाचे जैनमेघदूत (इ.स. १३४६ ते १४१४), चरित्रसुंदर गणीचे शीलदूत (१५ वे शतक), वादिचंद्रसूरीचे पवनदूत (१७ वे शतक), विनयविजयगणीचे इन्दुदूत (१८ वे शतक) मेघविजयाचे मेघदूत समस्या लेख (१८ वे शतक) ही उत्कृष्ट संदेशकाव्ये असून त्यात सौंदर्याबरोबरच जीवनमूल्यांचाही विचार केला आहे. अशा काव्यातून शांत रसाची जणूं सरिताच निर्माण करुन, शाश्वत जीवनाचा आनंद लुटण्याची संधी मानवाला दिली आहे.

**७. सूक्तिकाव्य-**

सूक्ति काव्यालाच सुभाषित काव्य असे म्हटले आहे. यातून उपदेश, प्रेम, नीति संबंधी अनेक सुभाषिते गुंफलेली दिसतात. नैतिक मूल्यांची जाणीव तथा शिक्षण देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. भाषा मनोरंजक असल्यामुळे त्यांची लोकप्रियता देखील अधिक वाढते. सत्य, त्याग, उदारता, अहिंसा, क्षमा, मार्दव यांचा सूक्ति काव्यात समावेश होतो. ही सूक्तिकाव्ये धार्मिक विशेषताशी संबंधित न राहता, शाश्वत व सार्वभौमिक मूल्याशी निगडित असतात. सूक्तिकाव्यात कल्पनेची भरारी, ऊहोक्ति, वर्णनवैचित्र्य, शब्दार्थ वैचित्र्य इत्यादि मुख्य तत्वे असतात.

सूक्तिकाव्यात पुढील संस्कृत जैन काव्यांचा समावेश होतो- १. गुणभद्राचे आत्मानुशासन (९ वे शतक), शुभचंद्राचे ज्ञानार्णव (१२ वे शतक) अमितगतिकृत रत्नसन्दोह (वि. सं. १०५०), अर्हद्दासाचे भव्यजनकंठाभरण (१३ वे शतक), सोमप्रभाचे सुक्तिमुक्तावलिकाव्य (१३ वे शतक).

**८. स्तोत्रकाव्य-**

स्तोत्र शब्दाला स्तुति व स्तव हे पर्यायवाची शब्द वापरले जातात. स्तोत्र शब्द स्तु+ष्ट्रन असा तयार झाला आहे. मलयगिरीने स्तुति व स्तव यातील अंतर व्यवहारभाष्यात सांगितले आहे. आराध्य गुणांची प्रशंसा करणे म्हणजेच स्तुति होय. स्तोत्र काव्यात परमात्मा, परमेष्ठी, देव-देवता यांची स्तुति केली आहे. जैन स्तोत्र साहित्याची निर्मिती भ. महावीर कालीन मानली असून त्यानंतर प्रथम शतकातील आचार्य कुंदकुंदांनी 'तित्थयर' शुध्दीची अर्थात स्तोत्राची रचना केली. त्यानंतर कुंदकुंदानी सिध्दभक्ति, श्रुतभक्ति, चरित्रभक्ति, योगभक्ति, आचार्यभक्ति, निर्वाणभक्ति यांचीही रचना केली आहे. याशिवाय विषापहार स्तोत्र, एकीभाव स्तोत्र, कल्याण मंदिर स्तोत्र, चतुर्विशति जिनानन्दस्तवन ही स्तोत्रकाव्ये प्रसिध्द आहेत.

**उपसंहार -** वरील सर्व विवेचनावरुन लक्षात येईल की, संस्कृत जैन कवींनी चरितनामान्त महाकाव्य, इतरनामान्त महाकाव्ये, ऐतिहासिक महाकाव्य, संधान महाकाव्य, एकार्थकाव्ये, लघुकाव्ये, संदेशकाव्य, दूतकाव्ये, सुभाषित व स्तोत्र साहित्य यांची रचना केली. हे सर्व काव्यसाहित्य काव्यकला व सौंदर्यबोधाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. सौंदर्य, जीवनसंभोग, त्यातील विचित्रता व त्याचबरोबर निवृत्तिमार्ग यांचे वर्णन केले आहे. नखशिखांत वर्णनात देखील हे कवि सिध्दहस्त असून, या कवींना नैसर्गिक सौंदर्याची असणारी आवड, कल्पकतेची भरारी, अंतःकरणातील माधुर्य, विविध रसांचे सुंदर चित्रण, भावानुभूतीची तीव्रता, विलास वैभवाची कमनीयता व त्याचबरोबर श्रमण परंपरेची या जैन कवींनी केलेली प्रतिष्ठापना वाखाणण्यासारखी आहे. कर्मवाद, पुनर्जन्माची व्याख्या, परलोक साधनेचे चित्रण, विविध राजांचे विलासाने युक्त असलेले जीवन व पुनः विरक्तीकडे घेतलेली धाव वाखाणण्यासारखी आहे. थोडक्यात जैन संस्कृत साहित्य सर्व दृष्ट्या समृध्द असल्याचे दिसते.

**काव्य साहित्य-प्राकृत**

प्राकृत काव्य साहित्याचे सर्वात प्रथम आणि प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, या साहित्यात धार्मिक उपदेश अथवा धार्मिक चरित्र यांचा कसल्याही प्रकारचा समावेश नाही. या काव्य साहित्याचे कर्तेच मुळी अजैन असल्याचे दिसतात. या साहित्याची रचना संस्कृत महाकाव्याच्या शैलीवर करण्यात आली आहे. या सर्व काव्यग्रंथातून शृंगाररसाची प्रामुख्याने प्रधानता दिसते. मुक्तक काव्य ही या युगाची एक महान देणगी आहे.

सर्व प्रथम एक असा गैरसमज मानला जात होता की, प्राकृत ही जैनांची भाषा असून तिच्यात धार्मिक ग्रंथाशिवाय काही नाही. परंतु अलीकडील काही विव्दानानी संशोधन करुन अशा प्रकारचे लौकिक साहित्य प्रकाशात आणे आले. या काव्यग्रंथात आपणाला अत्यंत महत्वाचे असे सेतुबंध, गौडवहो, गाथासप्तशती, वडजालग्ग इत्यादि मौलिक काव्यग्रंथ पाहावयास मिळतात. या काव्यातून प्रकट झालेली सरसता, मधुरता तथा अलौकिकता सर्व विव्दानांना मान्य झाली आहे. वर उल्लेखित सर्व ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतमध्ये असून त्यांचे आपणाला दोन वर्गात विभाजन करता येईल. १) प्रबंध काव्य आणि मुक्तक काव्य.

प्रबंध काव्यातच महाकाव्य आणि खंड काव्याचा समावेश आहे. महाकाव्यात आचार्यांनी सांगितलेले सर्व गुण दिसून येतात. कथा संगठन, रचना कौशल्य, शैली तथा अलंकारपूर्ण भाषा, विविध दृश्यांचे सुंदर वर्णन, शब्दांची कलापूर्ण रचना, अर्थ गांभीर्यादि बहुतेक गुण या महाकाव्यातून आढळतात.

महाकाव्याप्रमाणे मुक्तक काव्य देखील भारतीय साहित्याचे एक श्रेष्ठ व रमणीय अंग आहे. याची सर्वात मुख्य विशेषता म्हणजे या मुक्तक काव्यात समाजजीवनातील विविध अवस्थांचे सजीवपणे चित्रण केले आहे. संस्कृत मुक्तक काव्य व्याख्या प्राकृत मुक्तक काव्याला बसू शकत नाही. यात अनुभूति आणि सुंदर सामंजस्य आहे. जीवन व काव्य यांचा सुंदर मिलाफ आहे. मार्मिकता अधिक असून विविध वृत्तींचा विकास सहज स्वाभाविक दिसतो. यात अधिकतर श्रृंगार, नीति, धर्म व प्रकृति सौंदर्याचे वर्णन आहे. वीर, रौद्र, भयानकादि रसांना प्राधान्य नाही. मुक्तक काव्यासारखे लालित्य, माधुर्य, उल्हास अन्य काव्यात आढळत नाही.

## प्राकृत महाकाव्य-

प्राकृत महाकाव्यात सेतुबंध, गौडवहो, लीलावई यांचा समावेश करता येईल. प्राकृतमधील ही महाकाव्ये साहित्याच्या सर्व अंगांनी परिपूर्ण आहेत. त्याशिवाय त्यातून प्रामुख्याने तत्कालीन समाज दर्शनही

घडते. या महाकाव्यांच्या शिवाय असाणिरुध्द व कंसवहो ही दोन महत्वाची पुराणावर आधारित असणारी खंडकाव्ये आहेत. महाकव्यांची माहिती खालीलप्रमाणे आहेत-

**१. सेतुबंध-** सेतुबंध हे प्राकृतमधील सर्वोत्कृष्ट असे महाकाव्य मानले जाते. या ग्रंथाची रचना प्रवरसेन यांनी केली असून याचा रचनाकाल साधारणपणे ५ शतक मानला जातो. यातील १५ सर्गापैकी पहिल्या आठमध्ये नल-नील तसेच वानरांच्याव्दारे समुद्रावर बांधल्या जाणाऱ्या सेतूचे वर्णन केले आहे. दंडी, बाण यांनी 'सेतुबंध' याचा उल्लेख 'सेतु' या नावानेच केला आहे. उत्तरार्धात रावण वधापर्यंतची कथा आहे. म्हणून याचे दुसरे नाव 'रावण वध' असेही आहे. कथा भाग संक्षिप्त असून त्यात काही विशेषता दिसून येत नाही. सीतेच्या विरहाने व्याकुळ झालेला राम तिची सुटका करण्यासाठी लंकेकडे प्रयाण करतो. तत्पूर्वीच तिचा वृतांत हनुमान रामाला सा ा ंगतो. लंकेला जात असताना वाटेत समुद्र आडवा येतो. तेथेच सर्वजण थांबतात. बिभीषण रामाला येऊन मिळतो. अनेक संकटांना तोंड देऊन वानरसेना समुद्रावर सेतु बांधते. त्यावरुन राम लंकेत जातो. रावण, कुंभकर्ण यांचा वध करुन सीतेची सुटका करतो. कथेचा शेवट रामाच्या अभिषेकाने होतो.

प्रस्तुत काव्यात अनेक ठिकाणी उपाख्यानांचा वापर केला आहे. पूर्वार्धात समुद्र, पर्वत, सूर्योदय, सूर्यास्त इत्यादि अनेक प्राकृतिक दृष्यांचे सुंदर व काव्यात्मकरीत्या वर्णन केले आहे. कवि कल्पनेची भरारी काही आगळीच आहे. उत्तरार्धात मानव प्रकृतीचे गंभीर विवेचन केले आहे. रामाचा लोभ, रावणाची चिंता, सीतेचा त्रास, बिभीषणाची कृतज्ञता, राक्षसांची क्रूर कृत्ये इत्यादींचे सूक्ष्म चित्रण रेखाटले आहे. वानरसेना व राक्षस सेना यांच्यातील युध्द चित्रमयरीत्या उभारले आहे. यात प्रामुख्याने वीर रसाची प्रधानता असून अनेक सुभाषितांचा भरणा यात आढळतो.

भाषेच्या दृष्टीने ही एक महत्वाचीकलाकृती असून तिच्यात अनेक अलंकाराचा व छंदाचा यथास्थित उपयोग केला आहे. बहुधा सर्व ठिकाणी आर्या छंदाचाच वापर दिसतो. या ग्रंथाच्या भोषेतून तत्कालीन समाजदर्शनाचे स्वरुप देशील चांगल्या रितीने रेखाटले आहे. या ग्रंथाचा रचनाकाल आठव्या शतकाचा पूर्वार्ध मानला जातो.

**२. लीलावाई-** 'लीलावई' हे महाराष्ट्री प्राकृतमधील सर्वोत्तम महाकाव्य असून त्यात प्रतिष्ठानचा राजा सातवाहन आणि सिंहल व्दीपची राजकुमारी लीलावती यांचे प्रेमकथा आहे. या दोघाशिवाय कुवलयावली, विपुलाशयख चित्रांगद, भीषणानन, शरदी, वसंतश्री, महानुमती विजयानंद इत्यादि अनेक इतर पात्रे आहेत. या विविध पात्रांच्या साह्याने मुख्य कथानकात उपकथानकाची योजना कवीने सुंदररीत्या केली आहे.

लीलावती ही वसंतश्रीची बहीण, शरदश्री हिची मुलगी असून एके दिवशी प्रतिष्ठान राजा सातवाहन (हाल) याचे चित्र पाहून त्याच्यावर मोहित झाली. पुढे आई-वडिलांच्या परवानगीनुसार ती राजाच्या शोधार्थ बाहेर पडली. ती गोदावरी तटावर आली. राजाचे सैन्य सिंहलकडे निघाले देखील होते. जात असतानाच सेनापति विजयानंदाचे जहाज फुटले व तो सुध्दा गोदावरी तटी आला. त्याने सिंहलाधिपतीच्या लिलावती कन्येला पाहिले व राजासाठी तिची निवड केली. परत प्रतिष्ठानला येताच सेनापतीने राजाला सर्व वृत्तांत सांगितला. राजाने सैन्यासह तिकडे प्रयाण केले. लीलावईशी विवाह करण्याची इच्छा प्रकट केली. लीलावईच्या समोर असणाऱ्या अडचणीची सोडवणूक होताच दोघांचा गांधर्व पध्दतीने विवाह झाला. त्यावेळी यक्ष, गांधर्व, सिध्द, विद्याधर, राक्षस आणि मानव हे वधू-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी हजर होते.

प्रस्तुतची लीलावई कथा प्राकृत महाराष्ट्री भाषेतील एक अति उत्तम काव्यकथा असून या कथेत दिव्य व मानुषी पात्रे असल्यामुळे तिला 'दिव्यमानुषी' कथा म्हटले आहे. या महाकाव्यात कवीने मंगलाचरणानंतर सज्जन-दुर्जन स्तुति निंदा केली असून स्वतःच्या कुलाविषयी माहिती दिली आहे व त्यानंतर कथानकाला सुरुवात करुन मुख्य कथानकाबरोबर उपकथानकांचा उपयोग केला आहे कवीने भगवती गौरी, शिव, गणेश या देवतांचा उल्लेख केला असून त्यात पूजा, आशिर्वाद व शापादींचेही वर्णन केले आहे. त्यात ज्योतिष, प्रारंभ, संयोग, जादूटोणा, मंत्रादीचाही समावेश आहे. या कथेचा आधार धार्मिक नसून ही एक लौकिक तसेच प्रेमावस्थाचे वर्णन करणारी सुंदर कलाकृती आहे. प्रसंगानुरुप नैसर्गिक दृष्यांचेही वर्णन केले आहे. राजाच्या जीवनाचे वर्णन देखील विस्तृत व काव्यात्मक आहे. ही रचना सर्ग, उच्छवासात विभाजित असून तिच्यात १३३९ इतक्या गाथा आहेत. शैली अलंकृत व साहित्यिक आहे.

या लीलावई ग्रंथाची रचना 'कोऊहल' कव्वं' या महान कवीने केली असून, रचनाकाल १० वे शतक मानला जातो.

या महाकाव्य ग्रंथाशिवाय 'सिरिचिंध कव्वं' अर्थात श्रीचिह्न काव्य व सोरि चरित हे दोन ग्रंथ देखील महत्वाचे आहेत. यातील श्रीचिह्न काव्य महाराष्ट्रातील असून त्यात १२ सर्ग आहेत. यातील आठ कृष्णलीलाशुक व इतर चार दुर्गामसाद लिखित आहेत. यात कृष्णाच्या लीलांचे वर्णन असून, त्याची भाषा लक्षणादर्श तसेच कुमारपाल-चरिताशी मिळती जुळती अशी आहे. ही रचना पांडित्यपूर्ण असली तरी तिच्यात सरसता दिसत नाही.

सोरिचरितात कृष्णाची कथा असून या ग्रंथातील भाषेत कृत्रिमता अधिक आढळते. प्रथमपासून शेवटपर्यंत यमकाचा वापर असून कवीचे पांडित्य त्यात दिसून येते. याचा कर्ता श्रीकंठ असून त्याचा रचनाकाळ १६ वे शतका इतका आहे. ते मलबारातील रहिवासी होते.

प्रवरसेनाचे सेतुबंध हे महाकाव्य शुध्द व साहित्य महाराष्ट्रीतील आहे. यात समासांचा वापर असून कांही ठिकाणी ही समासशैली जटिल झाली आहे. तत्कालीन संस्कृत शैलीचा त्यावर अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो.
सर्गाअंति छंद बदलत असलेला दिसतो. या ग्रंथ कृतीचा प्रभाव संस्कृत व प्राकृत व अपभ्रश यांच्यावर देखील पडलेला दिसून येतो. यावर रामप्रदीप नावाची टीका लिहिली असून ती प्रसिध्द आहे. या काव्यानंतरच रावणवध, गाडवध, शिशुपालवध, कंसवध यांची रचना झालेली दिसून येते. थोडक्यात प्रवरसेनाचे सेतुबंध हे महाकाव्य प्राकृतमधील प्रमुख महाकाव्य मानले जाते.

**३. गौडवही-** लौकिक आचारानुसार लिहिलेले हे एक प्रबंध काव्य आहे. सूक्ष्मपणे व महाकाव्य लक्षणांच्या कसोटीवर या काव्याची तत्वे पडताळून पाहिला. असता हे महाकाव्य नसल्याचे मान्य करावे लागेल. या ग्रंथाच्या नावावरुनच गौड देशातील एखाद्या महान व्यक्तीचे चरित्र यात असावे असे वाटते, परंतु तसे काही नाही. कदाचित हे महाकाव्य अपुरे असून, अपुऱ्या भागातील पूर्वार्धाचे यात वर्णन केलेले असावे. अर्थात हे मत आपणाल कवीच्या अंतिम सूचनेवरुन देता येते. या ग्रंथातील कथानक ऐतिहासिक आहे.

कनोजचा राजा यशोवर्मा वर्षाऋतु संपताच गौड देशावर आक्रमण करण्याची तयारी करतो. शरदगमनाबरोबर विजय यात्रेचा देखील आरंभ होतो. कनोजपासून मगधापर्यंत असणाऱ्या सर्व दृश्यांचे व ऋतुंचे हृदयस्पर्शी वर्णन यात आहे. विजय यात्रेचे वर्णन तर काव्यसौंदर्याने परिपूर्ण आहे. यशोवर्मा चाल करुन येत असल्याचे ऐकताच गौड अधिपति पळून जातो व शेवटी त्याचा अंत होतो. यशोवर्मा विजय प्राप्त करुन परत फिरतो. प्रस्तुत काव्यात बंगदेश, पंजाब, आयोध्या, कनोज, कांधार, माळवा इत्यादी देशांचे वर्णन केले आहे.

गौडवहो महाकाव्य नसल्याचे आपणाला खालील मुद्यावरुन सिध्द करता येईल. १) या ग्रंथाचे विभाजन सर्गात नसून कुलकात आहे. २) यातील वर्णन संथगतिचे असून प्रसंगानुरुप नाही. त्यात कथानकाच्या अनेक तत्वांची त्रुटि भासते.

## उसाणिरुध्द कंसवहा: खंडकाव्य-

प्राकृतमधील उसाणिरुध्द व कंसवहो ही दोन महत्वाची खंडकाव्ये असून ती भागवत पुराणाच्या आधारानुसार लिहिला गेली आहेत. या दोहोंची विभागणी चार-चार सर्गात केली आहे. उसाणिरुध्द व कंसवहो या दोन्ही रचना रामपाणिवादाने केल्या असून तो केरलदेशी होता. रामपाणिवाद ही मलबारमधील एक जात असून विविध नाटक रचनांचे प्रयोग करुन दाखविणे हे तिचे काम होते. 'पाणिवाद' या शब्दाचा अर्थ ढोल असाही होतो. केल अथवा मृदंग वाजविण्याच्या कामावरुनही याचे नाव पडले असावे. हा लेखक जरी शुध्द जातीचा असला तरी त्याचे अंतरंग साहित्यिक सौंदर्याने काठोकाठ भरले होते. संस्कृत आणि प्राकृतचे ज्ञान या कवीला चांगल्याप्रकारे होते.

उसाणिरुध्द काव्यात उषा व अनिरुध्द यांच्या प्रेमकथेचे वर्णन केले असून साहित्यिक दृष्ट्या ते अप्रतिम असे आहे. उषेचे स्वप्न, तिचा विरह, अनिरुध्दाची मोठ्या कष्टाने प्राप्ति परंतु पुनः वियोग व पुनः मिलन या सर्व गोष्टींचे सुंदररित्या विवेचन केले आहे. प्रसंगानुरुप विविध राजे, राजधान्या, सभामंडप, विवाह सोहळा यांचेही वर्णन केले आहे. यात एकूण २८० पद्य असून या काव्यात संस्कृत छंदांचाही वापर आहे.

'कंसवहो' या काव्यात रामपाणिवादाने कंसाचा वध कसा झाला याचे वर्णन केले आहे. प्रामुख्याने सर्वप्रथम कृष्णाचे विविध पराक्रम वर्णिले आहेत. हे सर्व वर्णन करीत असताना मथुरादि नगरीची वर्णने त्यात आली आहेत. कृष्णाला कवीने नानाविध विशेषणांनी संबोधिले आहे. याशिवाय रामपाणिवादाचे एक एकांकी नाटक देखील प्राकृतमध्ये आहे. रामपाणिवादाच्या रचना संस्कृत व मल्याळीमध्ये देखील आहेत. त्यांचा काल इ. स. १७०७ ते १७७५ इतका आहे.

## मुक्तक काव्य-

मुक्तक काव्यात गाथासप्तशती, वज्जालग्गं, विषमबाणलीला, मदन मुकुट हे महत्वाचे ग्रंथ येतात. प्राकृत साहित्यातील हे मुक्तक साहित्य म्हणजे, प्राकृत साहित्य भांडारातील एक अनमोल असा खजिना होय. या मुक्तक काव्यात समाज जीवनाचे इतके प्रकर्षाने व जीवंतपणे वर्णन केले आहे की, वाचकांच्या दृष्टीसमोर तत्कालीन समाजाचा चित्रपट उभा राहतो. कोणत्याही काळातील साहित्यात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब अंतर्भूत असते. प्रस्तुत प्राकृत साहित्यातील मुक्तक काव्य ही त्यास अपवाद आढळत नाही.

मुक्तक काव्याची रचना महाकाव्यापेक्षा अधिक कठीण असल्याचे मानले जाते. सर्वसाधारण कवीला मुक्तक काव्याची रचना करणे कठीण असते. कारण मुक्तक काव्यातील प्रत्येक पदात रस, अर्थसंगठन व स्वतंत्र भाव असावा लागतो. महाकाव्यात सलग कथानक असून त्यातच वाचक रंगून जातो. त्याला काव्याच्या गुणदोषांचे सारासार विचार करावयास वेळ मिळू शकत नाही अथवा तिकडे आपोआपच दुर्लक्ष होते. मुक्तक काव्यात कथेचा आधार नसून व पूर्वसंबंधापासून वेगळे असल्यामुळे ते मुक्तक पद्य रसावर अवलंबून असते. यात व्यंगतेची अधिकता असते. या सर्व बाबींचा विचार करता मुक्तक काव्य हे साहित्यातील एक अवघड आणि महत्वाचे अंग आहे हे नाकारता येणार नाही.

### १. गाथासप्तशती-

कवि वत्सल हाल राजाने एक करोड गाथामधून सुंदर व अलंकृत अशा सात शतकांची निवड करुन गाथासप्तशती या ग्रंथाची रचना केल्याचे मानले जाते. 'सात शतकांनी युक्त' व प्रत्येक विभागात एक शतक इतक्या गाथा आहेत, म्हणूनच या ग्रंथाला 'गाथासप्तशती' असे म्हटले आहे. या प्रत्येक गाथेतील विषय वेगवेगळा असून त्यांच्याव्दारे सामाजिक, राजकीय, आर्थिक भौगोलिक व धार्मिक गोष्टींचे विवेचन करण्यात आले आहे.

हा संपूर्ण ग्रंथ शृंगाररसाने परिपूर्ण असून प्रसंगानुरुप करुणा रसाचाही अवलंब केला आहे. यात युवक युवतींच्या प्रेमचेष्टांचे अत्यंत सुंदर रीतीने चित्रण केले आहे. एकच तरुण अनेक तरुणींच्या प्रेमात असल्यामुळे मूळ युवतीची होणारी अवहेलना सुंदररित्या टिपली आहे. याशिवाय या तरु-तरुणींची नदीकाठ, साळीची शेते, अशोक वाटिका ही विविध संकेत स्थळे असून ती तेथे एकमेकांना भेटत असताना दिसतात. गाव पाटलाची मुलगी अनेक तरुणांचे स्वतःकडे कसे मन आकर्षित करुन घेते याचेही वर्णन केले आहे. प्रेमविषयक गोष्टीचे विवेचन करीत असताना बहुतेक सर्व प्रेमावस्थांचे त्यात वर्णन आले आहे.

शृंगाराने परिपूर्ण भरुन ओसंडून वाहाणाऱ्या या ग्रंथात विविध तसेच नायिकांचे भेद सांगितले आहेत. उदा.- साध्वी, कुलटा, पतिव्रता, वेश्या, स्वकीया, परकीया, संयमशील, चंचला, वियुक्ता, संयुक्ता, परित्यक्ता, अभिसारिका इत्यादि. याशिवाय शेतकरी पुत्र, शेतकरी, ग्रामबंधु, गोपी, गवळणी, शेतकरी पत्नि यांचेही चरित्र चित्रण रेखाटून त्यांची दिनचर्या, वेषभूषा, आचार-व्यवहार, रीति-रिवाज, व्रत, नियम, उत्सव, पूजापाठ, त्यांची सुख-दुःखे यांचे अंतर्बाह्य सुंदर विवेचन केले आहे. असे चित्रण अन्यत्र क्वचित पाहावयास मिळते.

नैसर्गिक सौंदर्य वर्णनात गडगडाट करणारे मेघ, विद्युल्लता, पवन, मयूर-नृत्य, कोकिळा कुंजन, पोपट पंक्ति, विविध वृक्ष, वेली यांचे वर्णन केले असून प्रसंगानुरुप विविध ऋतूंचेही वर्णन केले आहे. कवीने आपल्या काव्यात गोदावरी भीमा वगैर नद्यांचा व विंध्यादि पर्वतांचा उल्लेख केला आहे.

गाथासप्तशती हे संपूर्ण काव्य प्राकृत महाराष्ट्री भाषेत असून, महाराष्ट्री प्राकृताचा तो एक अति उत्तम नमूना आहे. या ग्रंथाची भाषाशैली सुंदर असून उपमा, उत्प्रेक्षा अलंकारांनी व विविध छंदानी युक्त आहे. काही देशी शब्दांचाही वापर केलेला आढळतो. थोडक्यात गाथासप्तशती हा प्राकृत काव्य विभागातील अति उत्तम व सर्वात परिपूर्ण असा ग्रंथ आहे.

**वज्जालग्ग-**

जयवल्लभसूरि रचित प्राकृत काव्य साहित्यातील वज्जालग्ग हा ग्रंथ देखील अतिप्रसिध्द व महत्वाचा असा आहे. यातील एकूण गाथांची संख्या ७९४ इतकी आहे. या गाथातून विविध विषय कथने केले आहेत. या विविध विषयानुरुप गाथानाच वज्जा असे म्हटले आहे. यांची संख्या ४८ इतकी आहे. यातील काही विषय पुढीलप्रमाणे आहेत-सज्जन, दुर्जन, मित्र, नीति, धैर्य, साहस, दैव, दारिद्र्य, सेवक, स्वामी, गज, सिंह, व्याध, हरीण, हंस, चंद्र, नयन, स्तन, लावण्य, प्रेम, मान, विरह, पुरुषोल्लास, दूती, सुगृहिणी, सती इत्यादि. मानवी व मानवतेवर प्रकृतींचे सुंदर चित्रण यात केले आहे. शृंगादिक पद्यांची संख्या निम्मि आहे. यात नखशिखांत वर्णन, नायक-नायिका वर्णन, प्रेमाचे संचारी भाव, विभाव, अनुभावाचे चित्रण, संयोग, विप्रलंभ, श्रृंगारादि अवस्थांची व्याख्याही केली आहे. या रचना कृतीच्या कर्त्याविषयी विशेष माहिती मिळत नाही.

उपर्युक्त ग्रंथाशिवाय विषमबाणलीला, मदनमुकुट या रचनाही महत्वाच्या आहेत. विषमबाणलीला हा ग्रंथ उपलब्ध नसून तो श्रृंगार व मुक्तक छंदाचा संग्रह असावा.

**मदन मुकूट-**

मदन मुकुट या रचनेचा कर्ता गोकूल मिश्र मानला जातो. परंतु त्याच्याविषयी अथवा त्याच्या कालाविषयी काही माहिती मिळत नाही. प्रस्तुत ग्रंथ नायक-नायिका भेद यावर आधारित असून, ऐतिहासिक दृष्ट्या त्याचे महत्व अधिक आहे. यात ८१ गाथा आहेत. यातील पद्यांची भाषा महाराष्ट्री प्राकृत आहे.

या ग्रंथाशिवाय नाट्यशास्त्र, ध्वन्यालोकलोचन, सरस्वती कंठाभरण, काव्यानुशासन, दशरुपक, काव्यालंकार, अलंकार सर्वस्व, अलंकार विमर्शिली, काव्यादर्श, काव्यप्रकाश-दीपिका, स्वयंभू छंद, साहित्य दर्पण, रसगंगाधर या विविध ग्रंथातून अनेक सुंदर सुंदर अशी प्राकृत पद्ये पाहावयास मिळतात.

थोडक्यात प्राकृत साहित्य हे महाकाव्य, खंडकाव्य, मुक्तक काव्य, या काव्य साहित्याच्या विविध अंगानी परिपूर्ण असून अत्यंत महत्वाचे असे आहे.

## अपभ्रंश काव्य साहित्य

संस्कृत व प्राकृत काव्य साहित्याप्रमाणेच अपभ्रंश भाषेतही 'काव्य साहित्य' ही मौलिक साहित्य संपत्ती आहे. या काव्य ग्रंथांतून विविध राजांची, राजकुमारांची व काही लोकांची चरित्रे सांगून समाजासमोर आदर्श ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अहिंसेचे महात्म्य दाखविण्यासाठी तर अनेक ग्रंथाची रचना त्या काळी करण्यात आली. संस्कृतमधील सोमदेवाच्या यशस्तिलक चंपूपासून १७ व्या शतकापर्यंत या प्रकारची ग्रंथरचना करण्यात आली. स्वतः पुष्पदंताने अपभ्रंशमध्ये लिहिलेले नायकुमारचरिउ व जसहरचरिउ हे ग्रंथ अत्युत्कृष्ट आहेत. या ग्रंथाशिवाय करकंडचरिउ, पउमासिरीचरिउ, सणंकुमारचरिउ हे ग्रंथ देखील महत्वाचे आहेत. या काव्यग्रंथाची माहिती पुढीलप्रमाणे -

## नायकुमार चरिउ-

या चरित्र काव्यग्रंथाची रचना अपभ्रंशमधील महाकवि गणल्या जाणाऱ्या पुष्पदंताने केली आहे. अपभ्रंश साहित्यात अत्यंत मोलाची भर या महाकवीने टाकली आहे. तिसट्ठिमहापुरिसगुणालंकारु या पुराणानंतर याच काव्यांचा क्रम येतो. प्रस्तुतच्या नायकुमारचरिउ कथेमध्ये प्रामुख्याने नागकुमाराच्या चारित्र्याचे वर्णन केले असून, प्रामुख्याने श्रुतपंचमीच्या कथेचे महात्म्य प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे. कामदेवाचा अवतार असलेल्या नागकुमाराचे चरित्र या ठिकाणी ९ संधीमध्ये सांगण्यात आले आहे.

मध्यदेशातील कनकपुर नगरात जयंधर राजा राज्य करीत होता. त्याच्या पत्नीचे नाव विशालनेत्रा असून तिच्यापासून त्याला श्रीधर हा मुलगा झाला होता. नंतर राजाने पुनः पृथ्वीदेवी या दुसऱ्या सुंदरीशी विवाह केला. तिला नागदेव नावाचा मुलगा झाला. तो लहानपणी जिनमंदिरातील एका विहिरीत पडला. नागकुमारांनी त्याचे संरक्षण केले. म्हणून त्याचे नाव नागदेव असे ठेवण्यात आले. पुढे नागकुमाराने विविध प्रकारच्या विद्या संपादित केल्या. त्याच्या सौंदर्यावर व चातुर्यावर अनेक तरुणी फिदा झाल्या. हे पाहून विशालनेत्रा व पृथ्वीदेवी या दोघीतील सवतीमत्सर वाढू लागला. श्रीधर देखील या सावत्र भावाचा व्देष करु लागला. एकदा त्याच नगरीत् एका हत्तीने सैरावैरा धावून गोंधळ माजविला. श्रीधर त्याला वश करण्यात असमर्थ ठरला तर नागकुमाराने त्याला धरले. त्यामुळे दोघातील सावत्रपणाचा भाव अधिकच वाढू लागला.

नागकुमाराचे विविध पराक्रम पाहून मथुरेचा राजकुमार व्याल हा त्याचा शिष्य झाला. श्रीधर हा मात्र नागकुमाराला आपला शत्रु समजून सदैव ठार मारण्याचा विचार करु लागला. हे जाणून त्याच वडिलाने त्याला देशातरास पाठविले. देशांतरास गेल्यावर त्याने अनेक पराक्रम केले. विनयपाल राजाची कन्या शीलवती हिला बंदीवासातून मुक्त केले. त्रिभुवनरतीचा वीणावादनात पराभव केला. शबरांच्य साह्याने विविध विद्या संपादन केल्या, अलोट संपत्ती प्राप्त केली. लक्ष्मीमती, गुणवती, रुक्मिणी, चंद्रा या विविध सुंदरीशी त्याने विवाह केला. पुढे आंध्रादि प्रदेशातून भ्रमण करीत असताना त्याची पिहितास्त्रव मुनीश भेट झाली. त्यांच्याजवळ श्रुतपंचमीव्रताच्या उपवासाचे फळ ऐकले. त्याचवेळी त्याच वडिलाचा मंत्री नयधर त्याला परत नेण्यासाठी आला होता. दरम्यान श्रीधराने दीक्षा घेतली होती. राजाने नंतर नागकुमाराचा अभिषेक करुन त्याला राज्यावर बसविले व स्वतः दीक्षा घेतली. पुनः नागकुमाराने आपल्या देवकुमार पुत्राला राज्यावर बसविले आणि व्यालादि सर्वासहित दीक्षा घेतली.

प्रस्तुत कथानक महाकवि पुष्पदंताने अत्यंत आकर्षकपणे मांडले आहे. वर्णनांची विविधता, छंदाची विपुलता, रसात्मक व भावनात्मक चित्रणांची नानाविधता यांनी हे कथानक उठावदार झाले आहे. जैन लेखकांच्यामध्ये नायकुमारचरिताची अधिक लोकप्रियता असलेली दिसून येते. सवतिमत्सर रेखाटण्यात कवीची कल्पकता अधिक उठावदार ठरली आहे. या काव्यात तत्कालीन समाजाचे देखील सुंदर चित्रण करण्यात आले आहे. खंडन मंडनाचा वापर केला आहे. बहुतेक काव्यातील नायक तथा अन्य पात्रे संसारापासून विरक्ति उत्पन्न होऊन दीक्षा घेतलेली दिसतात. जैनधर्माचे मूल विरक्तिमूलक असले तरी अशा प्रकारच्या रोमॅन्टीक कथा काव्यातून सुखोपभोगांची रेलचल झालेली दिसून येते. सर्वात शेवटी मोक्षप्राप्ति हे साध्य सर्वत्र सारखे दिसून येते.

**जसहरचरिउ-**

महाकवि पुष्पदंताने १० व्या शतकाचय दरम्यान नायकुमारचरिउ व जसहरचरिउ या दोन्ही चरित्र ग्रंथांची रचना केली. जसहरचरिउ हा ग्रंथ देखील अपभ्रंशमधील एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात एकूण चार संधी असून हिंसेचे दोष व अहिंसेचा प्रभाव या ग्रंथातून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

यौधेय देशाची राजधानी राजपूर येथे मारिदत्त राजाची भैरवानंद या एका कापालिकाचार्याशी भेट झाली. त्याच्या आज्ञेवरुन राजाने आकाश गामिनी विद्या प्राप्त करण्यासाठी नरबली यज्ञाची तयारी केली. त्यासाठी नोकरांनी जैनमुनी सुदत्त त्याचा शिष्य अभयरुची व त्याची बहीण अभयमती यांना पकडून आणले. राजाने त्यांना त्यांचा वृत्तांत विचारला. तेव्हा अभयरुचीने आपला जन्मवृत्तांत कथन करण्यास सुरुवात केली- खरोखर हे महाराज ! माझे नाव यशोधर असून, मी राजपुत्र यशोधर यांचा पुत्र आहे. मी मोठा होताच पित्याने अमृतमतीशी माझा विवाह केला. मी तिच्यावर पूर्णतः आसक्त होतो. परंतु एकदा एका कुबड्याशी स्वतःची पत्नी व्यभिचार करीत असताना पाहून मला विरक्ति उत्पन्न झाली. यशोधराने मुनिदीक्षा घेण्याचा विचार केला. त्यावेळी त्याच्या आईने त्याला या कृत्यापासून परावृत्त केले. अमृतमतीने नंतर त्या दोघांनाही विष देऊन ठार केले. त्या यशोधराच्या मातेने व त्याने अनेक पशुयोनीत परिभ्रमण केले. त्या योनीमध्ये त्याचा मुलगा जसवइ व त्याची व्यभिचारिणी पत्नी अमृतमती या दोघांनी मिळून त्या पशूंना अनेक वेळा ठार केले. विविध प्रकारच्या पशुयोनीतील दुःख भोगून ते दोन्ही जीव जसवईचा मुलगा व मुलगी म्हणून जन्मले. शिकारीसाठी जसवइ वनात गेला असताना त्याने सुदत्त मुनीवर कुत्रे सोडले. परंतु मुनींच्या तपोबलाच्या प्रभावाने ते विनम्र झाले. त्याचवेळी एका श्रेष्ठीने राजाला मुनीचे माहात्म्य सांगितले. राजाला ते पटले. हे मुनी अवधिज्ञानाने युक्त आहेत. हे जाणून राजाने त्यांना भूतकालीन आई, वडील व आजी यांचा वृत्तांत विचारला. त्यावेळी त्यांच्या भवभ्रमणाची सर्व हकिकत सांगून राजाचे वडील व आजी हेच सध्या अभयरुची व अभयमती नावाने तुझ्याच पोटी मुलगा व मुलगी म्हणून जन्मल्याचे मुनींनी सांगितले. संसाराचे हे वैचित्र्य व दुर्दशा जाणून जसवईने दीक्षा घेतली. राजाच्या मुलामुलींनाही वैराग्य उत्पन्न होऊन त्यांनी क्षुल्लकाची दीक्षा घेतली. त्यानंतर सुदत्त मुनीबरोबर बिहार करीत असताना मारिदत्त राजाच्या नोकरांनी पकडून आणल्याचे त्यांनी राजाला सांगितले. ते ऐकताच राजासह राणी चंडमारी, पुरोहित भैरवानंद या सर्वांना विरक्ति उत्पन्न झाली.

या कथानकाचा प्रमुख उद्देश जीवहिंसेला विरोध करण्याचा असून कथानकाचा विकास नाटकीय पध्दतीने झालेला दिसतो. या कथानकाची दुसरी विशेषता अशी की, या ग्रंथातील संपूर्ण कथानक धार्मिक आणि दार्शनिक उद्देशाने परिपूर्ण आहे. काही ठिकाणी अध्यात्मिक संकेत आढळतात. या काव्यातून कवीचा

आदर्श सहजपणे वाचकाच्या समोर उभा राहतो. पौराणिक काव्याच्या सर्व परंपरा यात असून शैली उत्तम व आत्मियता उत्पन्न करणरी आहे. स्वत:कवीने आपल्या रचनेला धर्मकथा म्हटले आहे.

## करकंडचरिउ-

या अपभ्रंश चरित्र काव्याची रचना मुनि कनकामर यांनी इ.स. १०५० च्या सुमारास केली आहे. करकंडचरिउ हे एक रोचक खंडकाव्य असून १० संधी आहेत. त्यातील तीन चतुर्थांश भागामध्ये करकंडूची मुख्य कथा सांगितली आहे व इतर एक चतुर्थांश भागात ९ अवांतर कथा सांगितल्या आहेत. या कथांचा उपयोग राजाला नीतिविषयीचे शिक्षण देण्यासाठी करण्यात आला आहे. एकदा चंपानगरीचा नरेश धाडीवाहन आपल्या प्रिय पत्नीचे पद्मवतीचे डोहाळे पूर्ण करण्यासाठी हत्तीवर बसून बाहेर फिरण्यासाठी गेला. नुकताच पाऊस पडून गेल्यामुळे व सुगंधी मातीच्या वासाने हत्ती मदोन्मत्त होऊन सैरावैरा अरण्याकडे धाऊ लागला. राणीच्या विनंतीवरुन राजा धाडीवाहन हत्तीवरुन उतरला. मात्र हत्तीने राणीला दूरवर अरण्यात नेले. एका सरोवरात हत्ती जलक्रीडा करीत असताना तिची सुटका झाली. पुढे स्मशानात तिने एका पुत्राला जन्म दिला. त्याचे हरण विद्याधराकडून करण्यात आले. हाताला खरुज झाल्यामुळे व ती सदैव खाजवीत असल्यामुळे त्या पुत्राचे नाव करकंडु ठेवले. दंतीपुरचा राजा मरण पावताच तेथे करकंडु राजा झाला. धाडीवाहन व करकंडु या दोघात पुढे एक युध्द झाले. राणी पद्मावतीने बापलेकांची ओळख पटवून दिली व सर्व राज्यकारभार त्याच्यावर सोपवून ते तपस्या करण्यासाठी निघून गेले.

करकंडूने दिग्विजय करुन चेर, चोल, पांड्य यांना जिंकले तेरजवळ गुंफा बांधल्या. अनेक राजकन्याशी विवाह केला. शेवटी शीलगुप्तमुनीजवळ धर्मोपदेश ऐकून दीक्षा घेतली व मोक्षाला गेला. प्रस्तुत चरित्र काव्य अपभ्रंश भाषेतील एक उत्कृष्ट काव्य म्हणून ओळखले जाते. ओघवती भाषाशैली, विविध छंदाचा वापर, मधून मधून अवांतर कथांच्या साह्याने दिलेला हितोपदेश व शेवटी मोक्षप्राप्ति या विविध घटनांनी हे काव्य फारच रोचक झाले आहे.

## पउमसिरी चरिउ-

घाहिल कवि रचित पउमसिरी चरिउ हे चरित्र खंडकाव्य चार संधीमध्ये विभागले आहे. हे काव्य एक सुंदर धार्मिक कथा आहे. पद्मश्री ही या कथानकातील नायिका असून, कवीने तिच्या पूर्व जन्मकथेचे वर्णन करुन माणसाला अशुभ कर्मानुसार कसे अशुभ फळ मिळते व शुभ कार्मानुसार कसे शभ फळ मिळते व मोक्ष

प्राप्ति होते याचे वर्णन केले आहे. कवीने हे काव्य अति उत्तम प्रकारे लिहिले आहे. पद्मश्रीचा वियोग राजस्थानी लोकगीतातील विरहीणी स्त्रीची आठवण करुन देतो. याशिवाय या काव्यातील नगरवर्णन, मानसिक स्थितीचे तथा विरह व्याकुलावस्था, संध्यासमय, चंद्रोदय इत्यादीचे सुंदर वर्णन केले आहे.

**सणंकुमार चरिउ-**

प्रस्तुत ग्रंथाची रचना श्रीचंद्राचे शिष्य हरिभद्र यांनी केली आहे. ही रचना सुमारे वि. सं. १२१६ मध्ये झाली असावी. या कथेचे कथानक साधे असून सुध्दा रचनाकर्त्याने त्यातून महान उपदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. या कथेतील नायक सनत्कुमार असून तो एकदा मदनोत्सवाच्या वेळी घोड्यावर स्वार झाल व त्याने देशोदेशी विहार केला. राजधानीत हाहाकार माजल्यावर त्याचे मित्र त्याच्या शोधात गेले. एका सरोवरातील किन्नीच्या तोंडून सनत्कुमाराची प्रशंसा ऐकून त्यांनी त्याला शोधून काढले. मध्यंतरी सनत्कुमाराने अनेक सुंदर युवतीशी विवाह केला होता. राजधानीत परत येताच मातापित्यांनी त्याच्यावर राज्यकारभार सोपविला व दीक्षा घेतली. सनत्कुमाराने देखील चक्रवर्ती झाल्यानंतर शेवटी दीक्षेचा स्वीकार केला. प्रस्तुत काव्याचे कथानक साधे, सोपे, सरळ, पण तितकेच रुचकर आणि आकर्षक आहे.

उपर्युक्त सर्व चरित्रात्मक काव्य ग्रंथाशिवाय अप्रकाशित असणारे अनेक ग्रंथ आहेत. त्यात आपणाला श्रीधरकृत सुकुमाल चरिउ, नयनंदिकृत सुदंसणचरिउ, सिंहकृत पज्जुण्णचरिउ, देवसेनगणिकृत सुलाचना चरिउ, धनपालकृत बाहुबली चरिउ, रयधूकृत सुकोमलचरिउ, लक्ष्मणरचित जिणदासचरिउ, नरसेनकृत सिरिवाल चरिउ इत्यादि ग्रंथांचा समावेश करता येईल.

## पुराण साहित्य

पुराण साहित्याचा समावेश प्रथमानुयोगात होत असून, त्यात अरिहंत, चक्रवर्ती या महापुरुषांची जीवन चरित्रे रेखाटलेली आढळतात. प्रथमानुयोगातील हे पुराण साहित्य म्हणजे, जैन इतिहासाचा प्रथम प्रवाह मानण्यात येतो. पुराण साहित्य आणि चरित्र साहित्य ही एकमेकांना बरीचशी जवळची असून त्यांच्यात विशेष फरक केलेला दिसत नाही. कथा, काव्य यांच्याप्रमाणे जैन मुनींनी महापुरुषांच्या चरित्राची तथा पुराणांची रचना केलेली दिसते. जेव्हा ब्राह्मणांनी पुराण ग्रंथाची रचना केली व रामायण, महाभारत यांची लोकप्रियता वाढू लागली, त्याचवेळी जैन विव्दानांनी राम, कृष्ण, विविध तीर्थंकर यांच्य जीवन चरित्राविषयी

लिखाणास प्रारंभ केला. त्रेसष्टशलाकापुरुष चरित्रामध्ये २४ तीर्थकर, १२ चक्रवर्ती, ९ वासुदेवख ९ बलदेव व ९ प्रतिवासुदेव यांचा समावेश केला आहे. कल्पसूत्रामध्ये ऋषभदेव, अरिष्टनेमि, पार्श्वनाथ व महावीर यांच्या चरित्रांचे वर्णन केले असून, समवायांग त्यातही कुलकर, तीर्थंकर, चक्रवर्ती, बलदेव, वासुदेव व प्रतिवासुदेव यांचे वर्णन आहे. परंतु ही वर्णनप्रणाली थोडी वेगळीच आहे.

याशिवाय या महान पुरुषांचे जीवन चरित्र आपणाला वसुदेवहिंडी, भरतेश्वराच्या कथावलीत, यतिवृषभाच्या तिलोयपण्णत्तीत, जिनभद्राच्या विशेषावश्यक भाष्यात, शीलांकाचार्याच्या व चउपन्नमहापुरिसचरिउ या ग्रंथातही पहावयास मिळते. या ग्रंथाच्याशिवाय काही स्वतंत्र पुराण ग्रंथाची तथा चरित्र ग्रंथांची देखील रचना झाली आहे. त्यात आपणाला आदिनाथचरित, सुमतिनाथचरित, चंद्रप्रभस्वामिचरित्र, वासुपूज्य स्वामीचरित्र, शांतिनाथचरित्र यांचा समावेश करता येईल. या सर्व महापुरुषांचे जीवन चरित्र या जैन आचार्यांनी आपल्या कल्पकतेनुसार रंगविले आहे. वासुदेव, राम, कृष्ण यांच्यावर अत्यंत सुंदररीत्या काव्य ग्रंथरचना केली आहे.